**MHRT010005912025**

## <u>मोटार अपघात किरकोळ अर्ज क्र.१३७/२०२५ मधील नि.१ वरील आदेश</u>

| | | |
|---|---|---|
| रत्नागिरी ग्रामीण पोलीस ठाणे, रत्नागिरी | | अर्जदार |
| विरुध्द | | |
| मेसर्स कॉन्फीडन्स पेट्रोलियम इंडिया लिमिटेड | | सामनेवाला |

१. प्रस्तुतचा मोटार अपघात किरकोळ अर्ज (D.A.R.) हा जयगड सागरी पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर क्र.८५/२०२५ शी निगडीत आहे.

२. दिनांक २४/०७/२०२५ च्या आदेशानुसार संबंधित प्रस्तावित अर्जदार यांना पोलीस निरीक्षक, रत्नागिरी ग्रामीण पोलीस ठाणे, रत्नागिरी यांचेमार्फत नोटीस काढण्यात आली. त्यानुसार पोहेकॉ/१२५७ रत्नागिरी ग्रामीण पोलीस ठाणे यांचा सामनेवाला याचे करीता नि.३ येथील अहवाल प्राप्त झाला. सदर अहवालामध्ये सामनेवाला यांना पुढील नेमली तारीखेची समज दिली व सदर तारखेस हजर राहण्यास सांगितले परंतू सामनेवाला यांनी त्यांना कोणतीही मोटार अपघात किरकोळ अर्ज क्र.१३७/२०२५ मध्ये नुकसान भरपाई नको तसेच मे. कोर्टात उपस्थित राहणार नाही असे नमूद आहे. त्यावरुन त्यांना या न्यायाधीकरणामार्फत कोणतीही नुकसान भरपाई मागण्यास स्वारस्य नाही असे दिसून येते.

३. या प्रकरणात सामनेवाला यांच्या वाहनाचे मोठया प्रमाणात नुकसान झाल्याचे प्रस्तूत मोटार अपघात किरकोळ अर्जात नमूद आहे. या प्रकरणात मृत व्यक्ती अथवा जखमी व्यक्ती आढळत नाही. अशा परिस्थितीत प्रस्तुतचा अर्ज प्रलंबित ठेवणे योग्य होणार नाही. सबब मी पुढील आदेश पारित करतो.

**<u>आदेश</u>**

प्रस्तुतचा मोटार अपघात किरकोळ अर्ज क्र.१३७/२०२५ निकाली करणेत येत आहे.

VINOD YASHWANTRAO JADHAV
Digitally signed by VINOD YASHWANTRAO JADHAV
Date: 2026.05.04 19:31:22 +0530

रत्नागिरी. (व्ही.वाय.जाधव)

दिनांक – ०४/०५/२०२६ सदस्य,

मोटार अपघात वाद न्यायाधीकरण, रत्नागिरी.

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| M.A.C.P.M.A. No. | :- | 137/2025. |
| Name of Stenographer | :- | A. B. Patil |
| Court Name | :- | Member, M.A.C.T., Ratnagiri. |
| Date of Decision | :- | 04/05/2026 |
| Order signed by P.O. on | :- | 04/05/2026 |
| Order uploaded on | :- | 04/05/2026 |